• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २७८ • रविवार,दि. ७ जानेवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 278 • Sunday 7 Janewari 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3

asianpaints
रूद्र कलर होम
आमच्याकडे सर्व प्रकारचे वॉटर कलर,सिमेंट कलर मिळतील.
प्रो.प्रा. वाघीरे 9146702323 8149800020
पत्ता : राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड,बीड

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
| बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

॥ श्री ॥
न्यू माऊली एन्टरप्रायजेस
आमच्याकडे सर्व प्रकारच्या सिल्वर पत्रावळी,पेपर डिश, द्रोण पेपर, ग्लास होलसेल दरात मिळेल.
प्रो.प्रा.बालासाहेब जाधव
9767444646, 9881128787
पत्ता : मौजे मन्यारवाडी,ता.जि.बीड

बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# महाराष्ट्रातून भाजप हद्दपार होणार

# मतदान प्रक्रियेवर जनतेचा विश्वास नाही



## २०२४ ला राज्यात सत्तापरिवर्तन अटळ

**मुंबई । वृत्तसंस्था**

**जगात कुठेही ईव्हीएम नाही. ज्या मतदान प्रक्रियेवर जनतेचा विश्वास नाही ती चालवून तुम्ही कोणत्या प्रकारची लोकशाही लादू आहात. रामांना घर देण्याची ताकद यांच्यात आहे, असे ते सांगतात तर तुम्ही बॅलेट पेपरवर निवडणुका का घेत नाहीत. बॅलेट पेपरवर निवडणुका झाल्यास ३३ कोटी देवही तुम्हाला वाचवणार नाहीत, तुम्हाला रामदेखील वाचवणार नाही, असा खोचक टोला शिवसेना ठाकरे गटाने लगावला. बॅलेट पेपरवर निवडणुका झाल्या तुम्हाला तर भाजप ग्रामपंचायत आणि नगरपालिका निवडणुकादेखील जिंकू शकणार नाही. या देशात मोदींचे राज्य नसून ईव्हीएमच्या माध्यमातून लादलेल्या हुकूमशाहीचे राज्य असल्याची टीका त्यांनी यावेळी केली आहे. भाजप बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यास का घाबरत आहे, असा प्रश्नही शिवसेना उध्दव ठाकरे गटाकडून त्यांनी यावेळी उपस्थित केला.**

२३ तारखेला नाशिकला ठाकरे गटाचे राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हे अधिवेशन होईल. या सभेची जय्यत तयारी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. मराठवाड्यात लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आज आढावा घेतला असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीतील जागावाटप जवळजवळ निश्चित झाले आहे. वंचित बहुजन आघाडीसोबतची चर्चा ही अंतिम टप्प्यात आहे. यावेळी भाजपला कोणीही मागच्या दाराने मदत करण्याचा प्रयत्न करणार नाही. ओठात एक आणि पोटात एक असं कोणीही करणार नाही.

**२०२४ ला देशात अन् राज्यात होणार परिवर्तन**

पुढील २-४ दिवसांत दिल्लीत जाऊन काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांसोबत आम्ही अंतिम चर्चा करून अंतिम मसुदा ठरवणार आहोत. देशात ३०० जागांवर काँग्रेस विरुद्ध भाजप अशी सरळ लढत आहे. १५० ते १७५ जागांवर प्रादेशिक पक्ष विरुद्ध भाजप अशी लढत आहे. ५४३ जागांचे गणित आमच्यासमोर स्पष्ट असून २०२४ ला या देशात आणि राज्यात परिवर्तन होईल.



**बीड : हिंदू हृदय सम्राट स्वर्गीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या सुविद्य पत्नी सर्वांच्या आईसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतीस अभिवादन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते आदी**

## खा.रजनीताई पाटील यांची स्क्रिनिंग कमिटीच्या अध्यक्षपदी

**केज । प्रतिनिधी**

अखिल भारतीय काँग्रेस समितीद्वारे आगामी २०२४ च्या लोकसभेच्या निवडुकीसाठी काँग्रेस पक्षाने तयारी सुरू केली असून आगामी निवडणुकीच्या दृष्टीने आता मोर्चे बांधणी सुरू झाल्या आहेत. आगामी लोकसभा



निवडणुकीसाठी गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, राजस्थान, दिल्ली, दमन - दीव आणि दादरा नगर हवेली या राज्यासाठी नुकतीच स्क्रीनिंग कमिटी निवडण्यात आली असून पक्ष अध्यक्ष व पक्ष नेतृत्व यांनी राज्यसभेच्या खासदार रजनीताई पाटील याची या समितीच्या अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली असून या समितीच्या माध्यमातून आता सबंधित राज्यात आता लोकसभेच्या उमेदवारांची निश्चिती करण्यात येणार असून पक्षातील ही मोठी जबाबदारी असणारी समिती असल्याने या निमित्ताने पुन्हा एकदा पक्ष नेतृत्वाने रजनीताई पाटील यांच्यावर मोठी जबाबदारी दिल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## सर्वोच्च न्यायालयाने रद्द केलेले मराठा आरक्षण सरकार कसे देणार ? संभाजीराजेंचा राज्य सरकारला सवाल

**सांगली । वृत्तसंस्था**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, म्हणून २००७ पासून महाराष्ट्र पिंजून काढला आहे. मराठा समाजाला कसे आरक्षण दिले जाऊ शकते, या बाबतीत अनेक वेळा मी भूमिका मांडली आहे. सध्या सरकार आणि मनोज जरांगे यांच्यामध्ये सध्या चर्चा सुरू आहे; पण सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण रद्द केल्यामुळे आता राज्य सरकार मराठा समाजाला कसे आरक्षण देणार आहे?, असा सवाल स्वराज्य संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष व माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थित केला. सांगलीतील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात शनिवारी आर्ट सर्कल प्रस्तुत 'युवारंग २०२४'च्या उद्घाटनप्रसंगी संभाजीराजे छत्रपती बोलत होते. आर्ट सर्कलचे अध्यक्ष सर्वज्ञ मोरे यांनी त्यांची मुलाखत घेतली. संभाजीराजे म्हणाले, सरकार आणि मनोज जरांगे यांच्यामध्ये सध्या चर्चा सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने एकदा मराठा समाजाचे आरक्षण रद्द केले आहे. पूर्वी रद्द झाल्यानंतर पुन्हा आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च





न्यायालयात गेला तर तिथे ते टिकणार आहे का? या सर्व गोष्टींचा विचार करण्याची गरज आहे. तसेच सध्या मराठा समाजाला आरक्षण देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. त्यांच्या या घोषणेच स्वागत करतो; पण मराठा समाजाला कसे आरक्षण देणार आहे, ते सरकारने जाहीर करण्याची गरज आहे. त्यामुळे मराठा समाजाच्या मनातील शंका संपणार आहेत. तसेच शेवटी भावना आणि न्यायिक याचा समतोल साधून गरीब मराठा समाजाला आरक्षण दिलं जावं, ही माझी अपेक्षाच आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. सध्या आमच्या स्वराज्य संघटनेचा फोकस विधानसभा निवडणुकांवर आहे. लोकसभा निवडणुकांबाबत सध्या तरी कोणताही निर्णय घेतला नाही. अजून वेळ आहे; पण सध्या तरी स्वराज्य संघटनेचे लक्ष विधानसभा निवडणूकच असणार आहे, असेही संभाजीराजे छत्रपती यांनी सांगितले.

BIS Hallmark
होलमार्क प्रमाणित दागिणे मिळण्यासाठी एकमेव ठिकाण..
दहिवाळ सुवर्णकार
* शुध्द सोने
* कुशल कारागिरी
* परतीची योग्य हमी
सुभाष रोड, बीड ☎ 230377, 8432771777
माळीवेस, बीड ☎ 220377, 9405072777

॥ श्री गंगाभारती कृपा ॥
आपल्या आवडीचा बेड आपल्या बजेटमध्ये
© 7038389999
ऑफर 10000 खरेदीवर १५% डिस्काऊंट
आदित्य फर्निचर मॉल
आजच बुक करा... आपल्या स्वप्नातील बेड...
सोमेश्वर मंदिरासमोर,बार्शी रोड,बीड

HTCS
Cell:9960509191
USB 1.1*1 + HD Audio + USB 3.0*1 + Type-C
METAL BODY & TRUE 200 WATT SMPS
PREMIUM Quality
Cor-i5- 2 gen.
DDR3- 8gb Ram
NVME M.2 256gb
HDD-500gb
Heavy Gauge Cabinet
HEAVY GAUGE
8500/- 1year warranty
T&C Apply

## पत्रकारांचे प्रश्न सभागृहात मांडणार -आ.संदीपभैय्या

**बीड । प्रतिनिधी**

बीडची पत्रकारिता ही परखड आणि प्रगल्भ आहे. पत्रकारांच्या ज्या समस्या मला पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि या कार्यक्रमानिमित्त उपस्थित पत्रकार बांधवांनी प्रामुख्याने सांगितले ते प्रश्न सोडविण्यासाठी मी पत्रकारांचा आवाज विधानसभेच्या सभागृहात पोहचवेल आणि न्याय देण्याचा प्रयत्न करेल अशी ग्वाही बीड विधानसभेचे आमदार संदीपभैय्या क्षीरसागर यांनी दिली. तर बीडच्या पत्रकारितेला लोकश्रय असल्यामुळे ती प्रगल्भ आणि निर्भिड आहे असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केले. येथील स.मा.गर्गे भवन येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा बीडच्यावतीने दर्पण दिनानिमित्त दर्पणकार पुरस्काराचे शानदार वितरण मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे लाभले. व्यासपीठावर पत्रकार संघाचे मार्गदर्शक संतोष मानुरकर यांच्यासह प्रमुख अतिथी म्हणून बीड विधानसभेचे आ. संदीपभैय्या क्षीरसागर, माजी आ.उषाताई दराडे तसेच उपविभागीय जिल्हाधिकारी करिश्मा नायर, अतिरिक्त पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख, संपादक संघाचे अध्यक्ष नरेंद्र कांकरिया, ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे, मुंबई येथून आलेले विशेष सत्कारमूर्ती पश्चिम भारत पी.टी.आय.प्रमुख विलासजी तोकले यांच्यासह सत्कारमूर्ती सर्वश्री ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर, मकदुम काझी, सी.आर.पटेल, अनिल भंडारी, महेंद्र मुधोळकर, संग्राम धन्वे, संतोष ढाकणे, आष्टीचे ज्येष्ठ पत्रविक्रेते भिमराव गुरव आदी मान्यवरांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना आ.संदीपभैय्या क्षीरसागर म्हणाले, आज प्रिंट मिडीयासह, इलेक्ट्रॉनिक मिडीया, सोशल मिडीया अगदी फास्ट झाली आहे. चुकूनही चुकीचं बोलणे कधी आंगलट येईल हे सांगता येत नाही. बीडमध्ये तर पत्रकारांच्या नजरेतून चुकीला माफीच नाही. बीडची पत्रकारिता डोळ्यात अंजन घालणारी असून ही बाब कौतुकास्पदच म्हणावी लागेल. पत्रकारांच्या आर्थिक प्रगतीकरीता ग्रामपंचायत अंतर्गत ५ हजार रुपयांपर्यंत अंक खरेदीला परवानगी आणि पत्रकारांच्या पेन्शन संदर्भात ज्या प्रमुख



अडचणी आहेत त्या अडचणीसह इतर ज्या काही अडचणी आहेत त्या सोडविण्यासाठी मी विधानसभेच्या सभागृहात प्रामुख्याने हा विषय मांडेल आणि न्याय देण्याचा प्रयत्न करेल अशी ग्वाही दिली. अध्यक्षीय समारोपात पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले, बीडच्या पत्रकारितेमध्ये उपजतच लेखणीची कला आहे. बीडच्या पत्रकारितेला व्यावसायिक अथवा राजकीय राजाश्रय अपेक्षित नसतांना सुध्दा बीडची पत्रकारिता प्रगल्भ असून रोखठोक लिहीणारी आहे. बीडच्या पत्रकारितेला केवळ लोकाश्रय असल्यामुळेच हे शक्य आहे असे मत व्यक्त केले. या प्रसंगी माजी आ.उषाताई दराडे म्हणाल्या, बीड जिल्हा मागास आहे असे मी मानत नाही तर बीड जिल्हा पुरोगामी असून आज देशाचे संविधान,लोकशाही धोक्यात असून ती वाचविण्यासाठी माध्यमातील पत्रकारांनी स्वातंत्रपूर्व पत्रकारितेप्रमाणे पुन्हा एकदा सामाजिक चळवळ म्हणून पुढे येणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. या प्रसंगी संपादक नरेंद्र कांकरिया यांनी आज शासन आणि प्रशासन दोघेही संवेदनशील राहिलेले नाहीत अशी खंत व्यक्त करुन पत्रकारांनी एकत्रित लढा देवून आपल्या समस्या सोडविल्या पाहिजेत असे मत व्यक्त केले. यावेळी सत्कारमूर्ती विलास तोकले, संपादक मकदुम काझी आणि संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांनी पत्रकारितेतील आलेले अनुभव व्यक्त करुन विस्तृत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे ▶▶ पान २ वर

## मराठी माणूस एकत्र राहू नये हा परप्रांतीय लोकांचा कट -ठाकरे

**मुंबई । वृत्तसंस्था**

गुजरातचा महाराष्ट्रवर डोळा आहे. जाती जातीत भांडण लावली जात आहेत. मराठी माणूस एकत्र राहू नयेत यासाठी बाहेरचे प्रयत्न करत आहेत. आज ज्या प्रकारचे राजकारण सुरु आहे ते पाहता, महाराष्ट्राचे तुकडे पडायला वेळ लागणार नाही, नागरिकांनी सतर्क राहिले पाहिजे, असा इशारा मनसे प्रमुख राज ठाकरेंनी दिला आहे. राज ठाकरेंच्या हस्ते मनसे सहकार शिबिराचं उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. राज ठाकरे म्हणाले, गुजरातचा महाराष्ट्रवर डोळा आहे. आपली महानंदा डेअरी अमूल गिळंकृत करते का असा प्रश्न उभा आहे. सहकर चळवळ सांभाळायला अनेक ग्रेट माणसे आहेत. इतिहासाकडून शिकले पाहिजे. वर्तमान हातून निघून जाईल. मराठवाड्यात विहिरीला ८००-९०० फूट पाणी नाही. साखर कारखाने उभा करून ऊस लागवड होते, पाणी जास्त लागते. पाणी खेचल्यास मराठवाड्याचे वाळवंट झाल्याशिवाय राहणार असे तज्ञ सांगत आहेत पण आम्हाला फरक पडत नाही . जमीन बरबाद होत आहे. वाळवंट झाल्यास ती जमीन पूर्ववत करायला ४०० वर्ष लागतील. जाती जतीत भांडण लावली जात आहेत. मराठी माणूस एकत्र राहू नयेत यासाठी बाहेरचे प्रयत्न करत आहेत. इथल्या लोकांना कळत नाही महाराष्ट्रामधील सर्व चांगले बाहेर काढा नसेल निघत तर उद्धस्त करा. घराच्या जमिनीचा तुकडा हे तुमचे अस्तित्व आहे. जगातील सर्व युध्द जमिनीसाठी झाली. भुगोलाशिवास इतिहास पूर्ण होत नाही. युद्ध म्हणजे जमिन ताब्यात घेणे ती लढवून घेतली जाते. पुर्वी लढाया तरी होत होत्या. आता कळत सुद्धा नाही आपल्या जमिनी गुपचुप विकत घेतलेल्या शिवडी न्हावा शिवा सागरी मार्गाच्या आजीबाजूची जमीन गेली आहे. रायगडमध्ये हीच परिस्थिती होणार आहे. बाहेरचे लोक जमिनी विकत घेणार ती माणसं आली की मराठी बोलायचे बंद होणार आहे. रायगड जिल्ह्याला मोठा धोका सतर्क राहा, जमिनी घालवू नका, असा इशारा राज ठाकरेंनी दिला आहे. राज ठाकरे म्हणाले, विरोधातील ही सहकार चळवळ सुरू आहे. आपले नेते लाचार , मिंदे झाले, पैशाने वेडे झाले आहेत त्यांना कळत नाही. कुठून कुठे जातात.. घरच्यांचा पण कळेना ▶▶ पान २ वर

# नव्या कायद्यात फॉरेन्सिकला महत्त्व,पण महाराष्ट्रात पदेच रिक्त!

**नागपूर । वृत्तसंस्था**

केंद्राने केलेल्या नव्या फौजदारी कायद्यात फॉरेन्सिक तपासाला अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. मात्र राज्य शासनाच्या फॉरेन्सिक लॅबमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून तब्बल ६० टक्के म्हणजे ३१५ पैकी २०१ पदे रिक्त आहेत. तर गतिमान तपासासाठी शासनाने लोकार्पण केलेल्या ४५ फॉरेन्सिक व्हॅनही गेल्या सहा वर्षांपासून मनुष्यबळाविना धूळखात आहेत. त्यामुळे एकीकडे गुन्ह्यांचा तपास रखडतोय तर दुसरीकडे फॉरेन्सिकचे विद्यार्थी काम मागत तळमळत आहेत. गुन्ह्यांचा योग्य तपास होण्याच्या दृष्टीने न्यायसहायक विज्ञान (फॉरेन्सिक सायन्स) महत्त्वाचे ठरते. त्यासाठी महाराष्ट्रात महासंचालकांच्या अधिनस्त न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा कार्यरत आहे. या आस्थापनेतील विविध पदे रिक्त असल्याने गुन्ह्यांच्या तपासात विलंब होत आहे. मंजूर असलेल्या एकंदर ३१५ पदांपैकी गट अ संवर्गातील ६२ आणि गट ब मधील १३९ अशी २०१ पदे रिक्त आहेत. विशेष म्हणजे, २८ सप्टेंबर २०२१ रोजी शासनाने फॉरेन्सिक लॅबमधील २९१ पदांच्या भरतीसाठी मान्यता दिली आहे. पण फॉरेन्सिक लॅबच्या कक्षेतील पदांसाठी अजून जाहिरातही आलेली नाही. त्यामुळे फॉरेन्सिक सायन्स झालेले बेरोजगार तरुण नोकरीच्या प्रतीक्षेत आहेत.

दरम्यान, फॉरेन्सिक तपासाचे काम गतिमान करण्यासाठी शासनाने २०१६ मध्ये राज्यात ४५ मोबाइल फॉरेन्सिक व्हॅनचे लोकार्पण केले. मात्र कर्मचारीच नसल्याने त्या धूळखात आहे. सन २०१७ मध्ये या व्हॅनसाठी ४५ कायमस्वरूपी पदे मंजूर करण्यात आली. परंतु त्यावर २०१७ साली केवळ ११ महिन्यासाठी कंत्राटी भरती करण्यात आली. त्यानंतर ही पदे रिक्त आहेत. केंद्राने केलेल्या तीन फौजदारी कायद्यामुळे फॉरेन्सिक विभागाचे महत्व वाढले आहे. ७ वर्षांपेक्षा अधिक शिक्षा असलेल्या सर्व गुन्ह्यांमध्ये फॉरेन्सिक तपास अधिकाऱ्यांची भेट अनिवार्य करण्यात आली आहे. त्यामुळे मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनची गरज वाढलेली आहे.

फॉरेन्सिकमधील पदांची सध्यस्थिती

पदे : मंजूर : रिक्त

महासंचालक : ०१ : ००, संचालक : ०१ : ०१, सहसंचालक : ०१ : ०१

उपसंचालक : २१ : १३

उपसंचालक (मानसशास्त्र) : ०१ : ०१

उपसंचालक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) : ०२ : ०२

सहायक संचालक : ६१ : २७

सहायक संचालक (मानसशास्त्र) : ०१ : ०१

सहायक संचालक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण) : १६ : १३

वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी : ०१ : ०१

विधी अधिकारी : ०१ : ०१

लेखा अधिकारी : ०१ : ०१

सहायक रासायनिक विश्लेषक : १८९ : ४२

सहायक रासायनिक विश्लेषक (एमएफएसयू) : ४५ : ४५

वैज्ञानिक अधिकारी (छाया) : ०१ : ०१

वैज्ञानिक अधिकारी (मानसशास्त्र) : ०४ : ०३

वैज्ञानिक अधिकारी (सायबर, टेप व स्पीकर) : ६० : ३५

प्रशासकीय अधिकारी : १५ : १३

प्रशासकीय अधिकारी (भांडार) : ०१ : ००

पालघर जिल्ह्यातील एका जामीन अर्जावर २२ डिसेंबर रोजी सुनावणी करताना उच्च न्यायालयाने फॉरेन्सिक लॅबमधील रिक्त पदांची गंभीर दखल घेतली आहे. लॅबमध्ये पदे रिक्त असल्याने न्यायालयात वेळेत अहवाल सादर होत नाहीत. फॉरेन्सिक लॅबच्या संचालकांनी अपुऱ्या मनुष्यबळाचा विषय गृहविभागाकडे मांडावा, गृहविभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांनी रिक्त पदे भरण्यासाठी ठोस पावले उचलावीत आणि त्याचा अहवाल २८ फेब्रुवारीपूर्वी सादर करावा, असे निर्देश न्यायमूर्ती जी. ए. सानप यांनी दिले आहेत.

पान १ वरून....

## मराठी माणूस एकत्र

आज कुठे आहेत त्यांनी त्यांची मने गहाण टाकली आहेत. माझा सैनिक स्वभिमान गहाण टाकणार नाही. पालघर , ठाणे , रायगड हातातून जात आहे. कोकण किनारपट्टीला मोठा धोका आहे. महाराजांनी सांगितले होते, आपला शत्रू समुद्रामार्गे येईल, समुद्रावर गस्त वाढवा. आपल्याकडे शत्रू समुद्रामार्गे आले. राज ठाकरे म्हणाले, माणसाला धंदा जमत नाही असे बोलतात पण असंख्य मराठी माणसे करोडोंचे व्यवसाय करतात पण गप्प असतात. शोबाजी करत नाही. जगातील प्रसिद्ध परफ्यूमचा अर्क हे ठाण्यातील केळकर बनवतात. आपली ताकद खुप मोठी आहे. राज्यात सहकार चळवळ उभी राहिली आहे. आताचे सरकार ही सहकार चळवळ नाही ती सहारा चळवळ आहे. महात्मा जोतीबा फुले यांनी सहकार चळवळ उभी केली. जमिनी श्रीमंताच्या घशात जावू नयेत म्हणून जोतीबांनी पहिले आंदोलन केले.

## पत्रकारांचे प्रश्न सभागृहात

प्रास्ताविकात पत्रकार संघाचे मार्गदर्शक दै. दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानुरकर यांनी पत्रकार संघाच्या विविध उपक्रमाबद्दल आणि बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार सोहळ्यामागील भूमिका स्पष्ट करुन हा पुरस्कार सोहळा पत्रकारांची उंची वाढवणारा ठरत आहे असे मत व्यक्त केले. या पुरस्कार सोहळ्याला बीडसह जिल्हाभरातील पत्रकार, पत्रकार प्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सुत्रसंचलन आणि आभार पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांनी मानले. स्पर्धा परिक्षेच्या तयारीला लागल्यानंतर वृत्तपत्राचे वाचन सुरु होते. वास्तवात जर लहानपणापासूनच वृत्तपत्राचे वाचन केले तर स्पर्धा परिक्षेतच नव्हे तर आयुष्याच्या प्रत्येक वाटेवर आलेल्या अपयशांना डावलून यश मिळविण्यासाठी फायद्याचे ठरेल असे माझे वैयक्तिक मत आहे. वृत्तपत्र हे जगाचे ज्ञान चालू घडामोडीतून सातत्याने देत असते, त्यावरच आपल्याला जगाची माहिती कळते. वृत्तपत्रात येणार्या चांगल्या आणि वाईट दोन्ही बातम्यांकडे प्रशासन म्हणून आम्ही बारकाने लक्ष ठेवतो, त्यामुळे सर्वसामान्यांना न्याय मिळण्यासाठी वृत्तपत्र हे प्रमुख दालन ठरते असे परखड मत बीड जिल्ह्याच्या नुतन उपविभागीय जिल्हाधिकारी करिश्मा नायर यांनी व्यक्त केले. मी मुंबईसह इतर जिल्ह्यात पोलिस अधिकारी म्हणून कर्तव्य बजावले. बीड जिल्ह्यात येवून मला एक वर्षे झाले आहे. हा कालावधी कमी असला तरी देखील मला पत्रकारांचा जवळून संबंध आला. बीड जिल्हा हा निश्चितपणे पुरोगामी विचारांचा असून येथील पत्रकारिता ही निर्भिड आहे. लोकप्रतिनिधी असो किंवा प्रशासन असेल जो कोणी चुकेल त्याला येथे माफी नाही. जो चांगले काम करेल त्याला निश्चित डोक्यावर घेतील, प्रेम देतील हा अनुभव मी घेतला आहे. बीडची पत्रकारिता कौतुकास्पद असून पत्रकार संघाच्या माध्यमातून आपल्याच क्षेत्रातील इतर पत्रकारांचा सन्मान करणे, त्यांचे कौतुक करणे आदर्शवत आहे असे मत बीडचे अतिरिक्त पोलिस अधिक्षक सचिन पांडकर यांनी व्यक्त केले. बीडचे भूषण दर्पणकार म्हणून पश्चिम भारत प्रमुख विलास तोकले, बीडचे दर्पणकार म्हणून दै.सुराज्यचे संपादक सर्वोत्तमआण्णा गावरस्कर, उर्दु दर्पणकार म्हणून दैनिक तामीरचे संपादक मकदुम काझी, इंग्रजी दर्पणकार म्हणून लोकमत टाईम्सचे बीड जिल्हा प्रतिनिधी सी.आर.पटेल, हिंदी दर्पणकार म्हणून दै.लोकमतचे उपसंपादक अनिल भंडारी, इलेक्ट्रॉनिक मिडीया दर्पणकार म्हणून टी.व्ही.९ चे बीड जिल्हा प्रतिनिधी महेंद्र मुधोळकर, न्युज पोर्टल दर्पणकार म्हणून मुंबई मराठीचे संग्राम धन्वे, यु.ट्युब चॅनलचे दर्पणकार म्हणून संतोष ढाकणे, अब्दुल कलाम वैचारिक दूत दर्पणकार म्हणून आष्टी येथील वृत्तपत्र विक्रेते भिमराव गुरव या सत्कारमूर्तींना मान्यवरांच्या शुभहस्ते शाल,श्रीफळ,सन्मनापत्र, सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले.

## काँग्रेसने लोकसभेच्या जागांसाठीच्या इच्छुकांची यादी मागवली

मुंबई : आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपला आणि विशेषत: नरेंद्र मोदी यांचा पराभव करण्यासाठी देशातील विरोधक एकत्र आले. 'इंडिया' आघाडी झाली. या आघाडीच्या वरचेवर बैठका होत असतात. याच इंडिया आघाडीतील मित्र पक्षांच्या महाराष्ट्रातील महाविकास आघाडीत हालचालींना वेग आला आहे. निवडणुकीच्या जागावाटपावर चर्चा होत असतानाच काँग्रेसने मात्र लोकसभेच्या सर्वच्या सर्व जागांसाठीच्या इच्छुकांची यादी मागवली आहे. काँग्रेस नक्की स्वबळावर लढण्याची तयारी करतंय की आघाडीतील मित्रपक्षांवर दबाव टाकतंय? याची सध्या राजकीय वर्तुळात चर्चा होतेय.

पान ४ वरून...

## व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने

भागवत जाधव, तालुकाध्यक्ष विनोद पौळ, उपाध्यक्ष विष्णु गायकवाड, कार्याध्यक्ष राजेश राजगुरू, ता.सचिव वैजीनाथ जाधव, सरचिटणीस मंगेश चोरमले, विनायक उबाळे, तुकाराम धस, अजहर इनामदार, आर.आर.बहिर, आतिख शेख, सचिन डोंगरे, बाबु कोकाट, दर्शन नाईक, कामराज चाळक, आसेफ शेख, रवी कुटे, आण्णासाहेब राठोड, आबासाहेब करांडे, संतराम जोगदंड, भागवत ढोरमारे, यासीन शेख, प्रदिप डोंगरे, श्रीराम बारहाते, सुधाकर फाटे आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाउपाध्यक्ष भागवत जाधव यांनी तर बहारदार सुत्रसंचालन व आभार तालुकाध्यक्ष विनोद पौळ यांनी व्यक्त केले.

## दर्पण दिनानिमित्त पत्रकार

प्राचार्य अप्पासाहेब येवले, जालंदर विद्यालयाचे प्राचार्य दादासाहेब खोले,सामाजिक कार्यकर्ते अजिनाथ गवळी,संतोष चांदणे यांच्यासह शहर कमिटीचे आनंद जावळे,सुरेश थोरात,शिवाजी वाघमारे,दिनेश गिरी,अजिनाथ काटे,कर्ण तांबे,सचिन गायकवाड, दादासाहेब पवार,चंद्रसेन मोरे एकता सैनिक संघटनेचे माजी सैनिक,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चौकट

*पत्रकार भवनासाठी जागा देणार-रोहिदास पाटील*

पत्रकार हे समाजाचे खऱ्या अर्थाने दर्पणकार असतात.ते समाजात घडणाऱ्या गोष्टी परखडपणे मांडत असतात.समाजाचे प्रश्न सोडविणाऱ्या पत्रकारांचे प्रश्न सोडविणे हे आपले कर्तव्य आहे.त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना हक्काची जागा असावी म्हणुन पत्रकार भवन निर्माण करण्यासाठी नगरपंचायतच्या माध्यमातून जागा उपलब्ध करुन देणार आहोत.

## पत्रकारांचा सन्मान

मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलुगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन आणि ग्रीक या तब्बल १० भाषांचे ज्ञान बाळशास्त्री जांभेकरांना होते.या भाषांसोबतच, विज्ञान, भूगोल, गणित आणि सामान्य ज्ञान या विषयांचे त्यांना खोलवर ज्ञान होते.बाळशास्त्री यांनी प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून कोकणातील शिलालेख आणि ताम्रपट यांच्यावर शोधनिबंध लिहिले.मुद्रित स्वरूपातील ज्ञानेश्वरी त्यांनीच पहिल्यांदा वाचकांच्या हाती दिली होती.बाळशास्त्री यांनी सुरू केलेले दर्पण हे वृत्तपत्र साडेआठ वर्षे चालले. त्यानंतर, १८४० मध्ये जुलै महिन्यात या वृत्तपत्राचा शेवटचा अंक प्रसिद्ध झाला.१८४० मध्ये जांभेकरांनीच 'दिग्दर्शन' या मराठीतील पहिल्या मासिकाची सुरूवात केली होती. या मासिकाचे संपादक म्हणून त्यांनी जवळपास ५ वर्षे काम पाहिले होते. त्याच अनुषंगाने आज वडवणी शहरातील नामवंत उद्योजक मधुकरराव धस, तसेच माजी आमदार केशवराव आंधळे,ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री, संजय आंधळे, रणजित धस यांच्या माध्यमातून दर्पण दिनाच्या निमित्ताने वडवणी तालुक्यातील सर्वच पत्रकारांचा प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी वही पेन शाल श्रीफळ देऊन सन्मान करतात. सविस्तर वृत्त असे की, दर्पण दिनाच्या निमित्ताने वडवणी तालुक्यातील सर्व पत्रकारांचा मानसन्मान धस कुटुंबीयांच्या वतीने करण्यात येतो त्यामुळे आज दिनांक सहा जानेवारी २०२४ रोजी साई आशीर्वाद ट्रेडर्स येथे मधुकरराव धस यांच्या वतीने पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित माजी आमदार केशवराव आंधळे, ज्येष्ठ पत्रकार सुभाष वावळ, ह भ प विठ्ठल महाराज शास्त्री, मधुकरराव धस, संजय आंधळे, रणजीत धस यांच्यासह त्यांच्या परिवारातील सदस्य मंडळी उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये प्रस्ताविक भाषणामध्ये बोलतांना मधुकरराव धस म्हणाले की, धस कुटुंबीयांच्या प्रत्येक सुख- दुखात व धस कुटुंबाला नावारुपाला आणण्यासाठी पत्रकारांचे मोठे योगदान आहे. एवढेच नव्हे तर आपणही समाजाचे काहीतरी देणे लागतो हे समजून आम्ही दरवर्षी न चुकता पत्रकारांचा मान सन्मान छोटेखानी करण्याचा प्रयत्न करतो. त्यानंतर ह भ प विठ्ठल महाराज शास्त्री म्हणाले की, ज्या उमेदीने पत्रकार बांधव समाजासाठी काम करतात दुसऱ्याला प्रसिद्धी देण्यासाठी त्यांची जी तळमळ असते ती बघून खरोखरच त्यांचं कौतुक करावं तेवढं कमीच आहे भविष्यामध्ये वडवणी शहराचं नाव नावारूपाला आणून मोठं करावं एवढीच अपेक्षा करतो आणि एकदा सर्व पत्रकार बांधवांनी वेदांत नगर येथे मठावर येऊन एक छोटेखानी भोजनाचा आनंद घ्यावा अशी या ठिकाणी विनंती करतो असे महाराजांनी सांगितले. त्यानंतर ज्येष्ठ पत्रकार सुभाष वावळ म्हणाले की, मी सुरुवातीला पत्रकार असतांना विधानसभेची निवडणूक लागली व त्या निवडणुकीमध्ये केशव दादा उभे राहिले परंतु जिव्हाळ्याचे संबंध असल्यामुळे मी त्या निवडणुकीचा प्रचारक म्हणून प्रचाराचा भाग होतो आणि त्या निवडणुकीला मला कोणीही म्हणायचे की तुम्ही पत्रकार आहेत का प्रचारक अशाप्रकारे आम्ही भरभरून मदत केली व एक कौटुंबिक जिव्हाळ्याचं नातं त्यांनीही सांभाळलं. त्यानंतर अध्यक्षीय भाषणात माजी आमदार केशव आंधळे म्हणाले की,मी सर्वसामान्य असतांना देखील पत्रकारांनी माझ्या संदर्भात जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात माझी ओळख निर्माण करून दिली. समोरचा प्रतिस्पर्धी तगडा उमेदवार असतांना देखील मला त्या काळात प्रसिद्धी दिली व विजय करण्याचे काम पत्रकारांच्या माध्यमातून नक्कीच झालेलं आहे. त्यामुळे सुभाष व्हावळ यांचं व पत्रकारांचे मोठे योगदान आहे. याही पुढे असच सहकार्य असावं व सर्वसामान्यांच्या प्रश्नाला वाचा फोडावी एवढेच या निमित्ताने अपेक्षा करतो असे माजी आमदार केशवराव आंधळे यांनी सांगितले. त्यानंतर आलेल्या सर्व पत्रकार बांधवांचे आभार मानण्यासाठी रणजित धस यांनी सांगितले की, माझ्या एका फोनवर आपण साई आशीर्वाद ट्रेडर्स या ठिकाणी येता हे आमच्यासाठी अभिनंदनीय बाब आहे. आम्ही आमचं भाग्य समजतो आणि धस कुटुंबीय आंधळे कुटुंबीय व पत्रकार बांधव हे एकाच कुटुंबातील सदस्य आहोत असे आम्ही समजतो. आणि म्हणूनच आम्हाला पत्रकारांचा सन्मान करावासा वाटतो. सर्वच पत्रकार बांधवांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्या.

## मराठा आरक्षण,शिवस्मारकाच्या

कार्यकर्त्यांच्या मनात आज हि आहे म्हणून बीड विधानसभेवर शिवसंग्रामचा झेंडा फडकवत मेटे साहेबांचे उर्वरित स्वप्न पूर्ण करणार असा निर्धार त्यांच्या शिलेगारांनी यावेळी व्यक्त केला . शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायण काशीद यांनी आपले मनोगत व्यक्त करताना... मेटे साहेबांचे स्वप्न मराठा आरक्षण हे होते त्यांच्या आरंभीच्या काळामध्ये त्यांनी मराठा महासंघाच्या माध्यमातून आपल्या राजकीय आणि सामाजिक कार्याला सुरुवात केली तसेच १९९८ मध्ये युती सरकारमध्ये ते आमदार झाले आणि स्वकर्तुत्वावर ते आज पर्यंत जवळपास पाच टर्म म्हणजे तीस वर्षे आमदार राहिले आणि आपल्या संघटनेचा राजकीय आणि सामाजिक वारसा जोपासला . त्यांनी विधानसभेवर तीन आमदार पाठवले . शिवसंग्रामची ही मोठी ताकद त्यांनी स्वकर्तृत्वाने उभी केली . शिवसंग्राम आज महाराष्ट्राच्या सत्तेत सहभागी आहे . यामध्ये मेटे साहेबांचे खूप मोठे योगदान आहे त्यांनी प्रत्येक कार्यकर्त्याला स्वाभिमान आणि संघर्ष शिकवला . चिकाटी -परिश्रम तसेच कठीण परिस्थितीमध्ये नेटाने काम करण्याची हिम्मत ठेवण्याची जी प्रेरणा दिली . त्याच्याच बळावर आज शिवसंग्राम मजबूत खांबासारखा उभा आहे आणि भविष्यातील आपले सर्व आव्हाने पेलण्यासाठी सज्ज आहे असेही त्यांनी म्हटले . मेटे साहेबांचे मराठा समाजातील गोरगरीब वंचित उपेक्षित समाजाला आरक्षण मिळावं यासाठी ४० वर्ष महाराष्ट्रामध्ये जनजागृती मोहिम काढली . अनेक आंदोलने केली . निवेदन दिली . उपोषण केले तसेच रस्त्यावरची लढाई लढत असताना न्यायालयीन लढाई लढले यामध्ये अनेक पुरावे स्वतः कोर्टासमोर ठेवत व वंचित उपेक्षित मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून ते प्रामाणिकपणे लढत होते . आज शिवसंग्राम आणि स्वर्गीय विनायकराव मेटे हे नाव आज महाराष्ट्राच्या घराघरातील - कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचले हे सर्व स्वतःच्या कर्तुत्वाने निर्माण केले होते . श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावं हे त्यांचे स्वप्न होते यासाठी त्यांनी विधानपरिषद व विधानसभेमध्ये अनेक वेळा मागणी केली व त्यांच्या मागणीला यश आलं आणि या स्मारकाच्या समितीचे अध्यक्ष म्हणून मेटे साहेबांची निवड झाली . त्यांनी हे काम नेटाने पुढे नेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जलपूजन केले . परंतु राजकीय सत्तांतरे व श्रेयवादामध्ये हे स्मारक अडकवले गेले परंतु शिवसंग्राम छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक व्हावं म्हणून भविष्यातही प्रयत्नशील राहिल . याप्रसंगी शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की महाराष्ट्र मधील आजचे राजकारण पाहता अनेक मोठमोठे पक्ष फुटली परंतु शिवसंग्राम अजूनही मजबूतपणे कार्यरत आहे . शिवसंग्राम आजही मजबूत आहे आणि नेटाने काम करत आहे . याचा सार्थ अभिमान आहे . सामाजिक संघटना टिकून ठेवायची असेल तर याला राजकीय जोड दिली पाहिजे तरच संघटना टिकत असते म्हणून शिवसंग्रामने आजपर्यंत अनेक आमदार बनवले परंतु बीड मतदारसंघांमध्ये शिवसंग्रामचाच आमदार झाला पाहिजे आणि ही जागा लोकनेते मेटे साहेबांची आहे म्हणून हे उर्वरित स्वप्न मावळे पूर्ण करतील अशी अशा व्यक्त केली . प्रत्येकाने आत्मविश्वासाने आणि स्वाभिमानाने काम करा सामाजिक संघटनेमधील स्नेहबंध व ऋणानुबंध असेच जोपासत रहा यश आपलेच आहे . ग्रामीण आणि शहरी भागामध्ये काम करत असताना सर्वसामान्य वंचित उपेक्षितांना न्याय मिळावा हा साहेबांनी दिलेला वैचारिक वारसा आपण सर्वांनी जोपासावा . आपल्याला एकमेकांच्या हातात - हात देत पुढे जायचं आहे अशी अपेक्षाही यावेळी त्यांनी व्यक्त केली .

## धारूर महाविद्यालयामध्ये

उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सिद्धेश्वर काळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रसिद्धी विभागाचे सदस्य प्रा. नागोराव वाघमारे, प्रा. विनायक कापावर, डॉ. नितीन कुंभार यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले. या कार्यक्रमाकरिता महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विठ्ठल केदारी व आभार प्रा. नागोराव वाघमारे यांनी मानले.


## जाहिर प्रगटन

मा. श्री.आर.जी.बागडे साहेब ४ थे सह दिवाणी
न्यायाधीश व.स्तर बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज २२२६/२०२३
सिताबाई विरूध्द निरंक

अर्जदार : १) सिताबाई भ्र. तुळशीराम वाघमारे, रा. चाकरवाडी, ता.जि.बीड, २) योगीराज पि. तुळशीराम वाघमारे (मयत) वारस, २अ) विमल भ्र. योगीराज वाघमारे, रा.चाकरवाडी, ता.जि.बीड, २ब) किरण पि. योगीराज वाघमारे, रा. चाकरवाडी, ता.जि.बीड, २ क) जयश्री पि. योगीराज वाघमारे,रा. चाकरवाडी, ता.जि.बीड, २ ड) अतिज पि. योगीराज वाघमारे, रा. चाकरवाडी, ता.जि.बीड, ३) विलास पि. तुळशीराम वाघमारे (मयत) वारस, ३ अ) सोजरबाई भ्र. विलास वाघमारे, रा. चाकरवाडी, ता.जि.बीड, ३ ब) अमोल पि. विलास वाघमारे, रा. चाकरवाडी, ता.जि.बीड, ३ क) अमृता भ्र. रमेश वाघमारे, रा. चाकरवाडी, ता.जि.बीड, ४) कैलास पि. तुळशीराम वाघमारे, रा. चाकरवाडी, ता.जि.बीड, ५) कविता भ्र. सुग्रीव येडे, रा. अंजनवती, ता.जि.बीड, ६) सुनिता भ्र. बळीराम कदम, रा. चाकरवाडी, ता.जि.बीड, ७) राधाबाई भ्र. बाळनाथ आणवने, रा. चाकरवाडी, ता.जि.बीड

विरूध्द निरंक

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत तुळशीराम कोंडीबा वाघमारे यांचा मृत्यू झाला, यांचे वारस असल्याबाबात त्यांना वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत तुळशीराम कोंडीबा वाघमारे यांचा मृत्यु दिनांक ३१/०५/२०१७ रोजी झाला आहे. वरील अर्जदारांव्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत तुळशीराम कोंडीबा वाघमारे यांच्या मृत्यूनंतर वरिल अर्जदारांना कार्यालईन उपयोगासाठी वारस प्रमाणपत्राची अवश्यकता आहे. त्या आर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्यात या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळते की जर सदर मुदतीत कोणी आल्या योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदरहू फोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीद दिसल्यास त्याना सदर मयत तुळशीराम कोंडीबा वाघमारे यांचे वारसप्रमाणपत्र देईल यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/१२/२०२३ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्काने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९/०१/२०२४ आहे.

क. लिपिक
मार्फत
ॲड. निळकंड बारगजे

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून.
स्वाक्षरीत
अधिक्षक,
दिवाणी न्यायालय,व.स्तर, बीड.

## जाहिर प्रगटन

मा.श्री.ओ.एन.मंत्री, २ रे सह दिवाणी न्यायाधीश
व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ दि.अर्ज क्र. १४/२०२४
माधव पि. बाबासाहेब बहीर व ईतर विरूध्द निरंक

अर्जदार : १) माधव पि. बाबासाहेब बहीर, रा. राजुरी (न.), ता.जि.बीड, २) अशोक पि. बाबासाहेब बहीर, रा. वरीलप्रमाणे.

विरूध्द निरंक

गैरअर्जदार :- निरंक (नील)

मागणी : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत १) लक्ष्मीबाई भ्र. बाबासाहेब बहीर, २) बाळू पि.बाबासाहेब बहीर यांचा मृत्यू झाला. यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत १) लक्ष्मीबाई भ्र. बाबासाहेब बहीर, दिनांक ०६/१२/२०२२ २) बाळु पि. बाबासाहेब बहीर यांचा मृत्यू दिनांक ३१/०५/२०२३ रोजी झाला आहे. यांचा मृत्यू वरील अर्जादरा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत १) लक्ष्मीबाई भ्र. बाबासाहेब बहीर, २) बाळू पि. बाबासाहेब बहीर यांच्या मृत्यूनंतर वरील अर्जदारांना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सरहून मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबातचा पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत १) लक्ष्मीबाई भ्र. बाबासाहेब बहीर, २) बाळू पि. बाबासाहेब बहीर यांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४/०१/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

प्रकरणातील पुढील तारीख ०८/०२/२०२४ आहे.

क.लि.

मार्फत
ॲड. एस.एस.उबाळे

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरीत
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

कार्यालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड
घर नंबर १-४-१६००, उत्तमनंदा बिल्डींग, पहिला मजला,
अंबिका चौक, पांगरी रोड, शाहूनगर, बीड, ता.जि.बीड पिन ४३११२२

जावक क्र. १६ दि. ३/१/२०२४ — तक्रार क्रमांक १८९/२०२३

## जाहिर नोटीस

तक्रार क्रमांक १५१/२०२३

अर्जदार : १. शरद चंद्रभान ठोंबरे,रा.स्वराज्यनगर, बीड, ता.बीड,जि.बीड

विरूध्द

गैरअर्जदार :- ०२) अश्विनी सुनिल वांढरे, (प्रबंधक) जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि. बीड मुख्य शाखा राजीव गांधी चौक,बीड, रा. विप्रनगर, ब्राम्हणवाडी, बीड, ता.जि.बीड. ०३) मनिष बबन शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि.बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, ०५) बबन विश्वनाथ शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि.बीड, राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, ०६) अश्विनी मनिश शिंदे, संचालक जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि.बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, ०७) मोनिका बबन शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि.बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, ०८) मयुरी योगेश करांडे, संचालक जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि.बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, ०९) शोभा सखाराम खरसाडे संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि. बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड,ता.जि.बीड, १०) भारत हरिदास सावंत, संचालक जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि.बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, ११) सुलभा नितीन कापसे, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि.बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, १२) रामभाऊ दामू कांबले, संचालक जिजाऊ माँसाहेब मल्टीसाहेब क्रेडीट लि.बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, १३) सुदाम रूस्तूम कांबळे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि. बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, १४) गणेश दत्तोबा रसाळ, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि. बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, १५) बालासाहेब भास्कर हाडुळे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि. बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, १६) वनिता अन्नासाहेब पायाळ, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि. बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, १७) उषा सोनाजीराव गव्हाणे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि. बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड, १८) आशा रंगनाथ शिंदे, संचालक, जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट क्रेडीट लि. बीड, रा. राजीव गांधी चौक, बीड, ता.जि.बीड,.

उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भीय तक्रार अर्जदार चंद्रकांत सदाशिव बांगर यांनी आपल्याविरूध्द तक्रार क्रमांक १८९/२०२३ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड येथे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीमध्ये आपणास पाठविण्यात आलेली नोटीस सामनेवाले क्र. २,३ व ५ ते १८ सदर व्यक्ती दिलेल्या पत्यावर भेटत नाही. UNCLAIMED असा शेरा लिहून परत आलेली आहे. तरी सदर जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने आपले म्हणणे मांडण्यासाठी आपण जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड येथे दिनांक ३०/०१/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रत्यक्ष किंवा प्रतिनिधीमार्फत उपस्थित रहावे. अन्यथा सदर तक्रारीबाबत आपणास काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०३/०१/२०२४ रोजी माझे सहीनिशी व मा.मंचाच्या शिक्क्यानिशी दिले.

मा.आयोगाच्या आदेशानूसार.

दिनांक ०३/०१/२०२४
ठिकाण : बीड

स्वाक्षरीत/-
प्रबंधक
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,बीड


Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

## महत्त्वाचे वृत्त..

### गुजरातचा महाराष्ट्राच्या जमिनी बळकावण्याचा डाव?

रायगड : महाराष्ट्रातील सर्व बाहेर नेण्यात येत आहेत. बाहेरचे लोक महाराष्ट्रात आपल्याच जमिनी किरकोळ किमतीत विकत घेत आहेत. आपल्या जमिनी काढून घेण्याची एक प्रकारची सहकार चळवळ महाराष्ट्राच्या विरोधात चालवली जात आहे. महाराष्ट्र एकसंघ राहू नये, यासाठी बाहेरच्या लोकांचे प्रयत्न सुरू आहेत आणि आपले नेते मिंधे, लाचार व पैशाने वेडे झाले आहेत, असा घाणाघात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पक्षांतर करणाऱ्या नेत्यांवर केला आहे. दरम्यान पुढे बोलताना राज ठाकरे म्हणाले की, महानंद डेअरी अमूल गिळकृत करतंय की काय असा सवाल उपस्थित झाला आहे. महाराष्ट्रात सहकार क्षेत्र चालविण्यासाठी सक्षम माणसे आहेत. महात्मा फुले यांनी खरी सहकार चळवळ उभी केली. त्यांनी जमीनी जाऊ नये म्हणून पहिले आंदोलन केले. राज ठाकरे म्हणाले की, आज महाराष्ट्रात २ लाख २२ हजार सहकारी संस्था आहेत. कुठल्याही राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणात संस्था नाही. तर महाराष्ट्राच्या खालोखाल येणाऱ्या गुजरातचा महाराष्ट्रावर डोळा आहे. इतिहासाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही, हातातून सगळे गेले की आपल्या हाती काही राहणार नाही. मराठवाड्यात राजकीय फायद्यासाठी मराठवाड्यात ऊस उत्पादन सुरू आहे, साखर कारखाने सुरू आहेत. त्यामुळे मराठवाड्यात ४० ते ५० वर्षात वाळवंट होईल असे तज्ञांनी म्हटले आहे. यामुळे महाराष्ट्रातील जमीनी बर्बाद होत आहे. राज ठाकरे म्हणाले की, आम्ही जाती जातींत भांडत आहोत. हे सर्व राजकीय फायद्यासाठी मराठी माणूस एकत्र राहू नये यासाठी बाहेरील व्यक्ती प्रयत्न करत आहेत. हे आमच्या नेत्यांना समजत नाहीये. राज्यातील जे चांगले आहे ते बाहेर काढले जात आहे, आणि जे नेऊ शकत नाही ते बर्बाद केले जात आहे. आज महाराष्ट्र इतका बेसावध आहे, की तुमच्या जमीनी हातात घेतल्या जात आहे. ठाणे, पालघरमध्ये सुरू झाले आहे. ते रायगडमध्येही सुरू होताना दिसून येत आहे.

### भन्ते हे समाजाचे मार्गदर्शक –थेरो

बीड : जगाला शांतीचा, समतेचा व दु:ख निवारण्याचा मार्ग दाखविणार्या धम्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचे बहुमोल कार्य संघातील भन्तेजींनी केलेले आहे. भन्तेजी हे समाजाचा आरसा असतात व ते समाजाचे मार्गदर्शक असतात असे प्रतिपादन भन्ते धम्मशील थेरो यांनी आपल्या देशनेद्वारे केले. महामानव सार्वजनिक वाचनालय धानोरा रोड बीड येथे पुज्य डॉ.भदन्त आनंद कौशल्यायन यांची ११९ वी जयंती दिनी उपस्थित उपासकांना धम्मदेशना व अभिवादन कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रसंगी महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले, से.नि. नोंदणी उपमहानिरीक्षक मधुकर जावळे, से.नि.जि.प्रबंधक एल.आय.सी.उमाजी वाघमारे, झुंजार नेताचे उपसंपादक आत्माराम ओव्हाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व प्रथम तथागतांना पुष्प, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व डॉ.भदन्त आनंद कौशल्यायन यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करुन धुप दीपाने पुजन करुन पुज्य भन्तेजींनी त्रिशरण, पंचशील दिले. आपल्या अनमोल देशनेत भन्ते धम्मशील थेरो म्हणाले की, डॉ.भदन्त आनंद कौशल्यायन यांनी; डॉ.बाबासाहेबांनी शेवटचा इंग्रजीत लिहिलेला ग्रंथ 'बुध्द अॅण्ड हीज धम्म' या ग्रंथाचे हिंदीत भाषांतर करुन सर्व सामान्यांना बुध्द धम्माची वस्तुनिष्ठ ओळख होण्याकरीता बहुमोल कार्य केले. पुढे याच हिंदी भाषांतरीत ग्रंथाचे पी.ई.एस. सोसायटीने समिती स्थापना करुन 'बुध्द आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ मराठीत भाषांतरीत केला. डॉ. आनंद कौशल्यायन संस्कृत, मराठी, इंग्रजी, पाली, सिंहली, पंजाबी, उर्दु, बंगाली अशा विविध १५ भाषेचे निष्णांत पंडीत होते. इंग्लड, जर्मनी, श्रीलंका व जगातील अनेक देशात बुध्द तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसारासाठी फिरुन त्यांनी सुमारे ६७ पुस्तके विविध भाषात लिहिली.

### मराठी पत्रकारितेतील आद्यसंपादक जांभेकर यांना अभिवादन

बीड : बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामसमृद्धी फाऊंडेशन यांच्या मार्फत आज दि.६ जानेवारी शनिवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयात मराठी पत्रकारीतेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत गेल्या ३४ वर्षांपासून लिंबागणेश पंचक्रोशीतील वाचकांना सेवा देणारे वृत्तपत्र विक्रेते उस्मान कोंडीबा तांबोळी आणि ग्रामीण युवा पत्रकार संघाचे युवा आघाडी बीड जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांचा पुष्पहार घालून शाल श्रीफळ देत सत्कार करून दर्पण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामसमृद्धी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.गणेश ढवळे यांनी ६ जानेवारी १८३२साली मराठी भाषेतील पहिले 'दर्पण' वृत्तपत्र सुरू करून मराठी पत्रकारीतेची मुहुर्तमेढ रोवत मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याची महती विशद करताना समाज कार्याची आवड असणाऱ्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी पत्रकारीता आणि साहित्याच्या माध्यमातून समाजकार्य करताना सरकार आणि समाजाला दर्पण दाखवण्याचे काम करत लोकांच्या मनावरील परंपरागत विचारांचा पगडा दुर करून विधवा पुनर्विवाह, स्त्री शिक्षण याचा पुरस्कार करत समाजातील मागासलेपण दुर व्हावा आणि समाजाची प्रगतीच्या दिशेने वाटचाल व्हावी या उद्दात्त हेतूने काम केल्याची भावना व्यक्त केली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रविंद्र निर्मळ यांनी केले तर आभारप्रदर्शन अशोक जाधव यांनी केले.

# नोव्हेंबर गेला २०२४ उजाडले तरी वाघनख्या महाराष्ट्रात पोहचल्याच नाहीत; विजय वडेट्टीवारांचा सरकारवर हल्लाबोल

**मुंबई । वृत्तसंस्था**

छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे आता एप्रिल–मे मध्ये महाराष्ट्रात येण्याची शक्यता आहे. यापूर्वी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी नोव्हेंबर महिन्यातचं ही वाघनखं महाराष्ट्रात येणार असल्याचा दावा केला होता. मात्र आता एप्रिल–मे मध्ये ही वाघनखे येणार असल्याचे बोलले जात आहे. राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी यावरून राज्य सरकारवर हल्लाबोल केला आहे. २०२४ उजाडले त्यात आता जानेवारी पण हुकले तरीही वाघनखे आली नाहीत असे ट्विट करत वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे.

विजय वडेट्टीवार यांनी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना टोला लगावत हे ट्विट केले आहे. ''नोव्हेंबर गेले, जानेवारी पण हुकले, सुधीरभाऊ वाघनखं कुठपर्यंत पोहोचली ? थाटामाटात विमानतळावर ढोल वाजवून, सरकारी तिजोरीतून जाहिरातबाजी करत तुम्ही वाघनखं आणायला लंडन पर्यटनाला गेले. येताना मात्र रिकाम्या हाताने परत आले होते. त्यानंतर वाघनखं नोव्हेंबर मध्ये येणार असं तुम्ही सांगितलं, तो महिना गेला..... वर्ष संपले, २०२४ उजाडले..आता जानेवारी पण हुकले! वाघनखं काही आली नाही... आता परत लंडनवारी करणार की पुढची तारीख देणार?'', असे वडेट्टीवार म्हणाले.


**शिवराज्याभिषेक सोहळयापूर्वी वाघनखं आणण्याचा मानस**



दरम्यान, यापूर्वी नोव्हेंबर महिन्यात ही वाघनखं महाराष्ट्रात येणार असल्याचा दावा राज्य सरकारने केला होता. तर जानेवारीमध्ये ते आणण्यासाठी राज्य सरकारकडून प्रयत्न सुरु होते. मात्र, ब्रिटन सरकारकडून प्रक्रिया सुरु असल्याने याला विलंब झाला. आता एप्रिल किंवा मे महिन्यात वाघनखे आणले जाण्याची शक्यता आहे. शिवराज्याभिषेक सोहळ्यापूर्वी ही वाघनखं महाराष्ट्रात आणण्याचा राज्यसरकारचा मानस असल्याचेही बोलले जात आहे.

शिवरायांची ही वाघनखे सध्या ब्रिटनच्या व्हिक्टोरिया अँड अॅल्बर्ट संग्रहालयात आहेत. तसेच सर्व काही ठरल्याप्रमाणे घडले तर या वर्षीच ही वाघनखं भारतात परत आणण्यात येतील, असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले होते. शिवाजी महाराजांनी १५ नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखानाचा याच वाघनखांनी कोथळा बाहेर काढला होता.

दरम्यान निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही वाघनखे राज्यात आणले जात असल्याच्या चर्चा सुरू होत्या. त्यावेळी वाघनखं हा निवडणुकीचा किंवा राजकारणाचा विषय असू शकत नाही, असा दावाही सुधीर मुनगंटीवार यांनी केला होता. छत्रपती शिवाजी महाराज हे जगातील साऱ्या शिवभक्तांसाठी आस्था आणि अस्मिता असल्याचे मुनगंटीवार म्हणाले होते.



बीड : शिवसेना शिंदे गटात अनिल जगताप यांचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर त्यांचा बाजीराव चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयात स्वागत करण्यात आले.

## मराठा आरक्षणासाठी आणखी एका तरुणाची आत्महत्या

**धाराशिव । वृत्तसंस्था**

मराठा आरक्षणासाठी होणाऱ्या आत्महत्या थांबता थांबत नसल्याचे चित्र असून तालुक्यातील दहिफळ येथील दहावी पर्यंत शिक्षण झालेल्या रोहण राजेंद्र भातलवंडे (१९ ) वर्षाच्या तरुणाने मराठा आरक्षणासाठी बलिदान देत आहे, सरकारने जागे व्हावे, आरक्षण द्यावे, अशी चिठ्ठी लिहून शेतातील बांधावर असलेल्या चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. गुरूवारी सायंकाळी ही घटना घडली असून आज ती समोर उघडकीस आली. कळंब तालुक्यातील दहिफळ येथील तरुण रोहण राजेंद्र भातलवंडे हा सुशिक्षित बेकार तरुण असून दहावीपर्यंत त्याचे शिक्षण झाले आहे. त्याने कृषी पदविका डिप्लोमा कोर्स केला आहे. नोकरीच्या शोधात फिरला परंतु कुठे नोकरीची संधी मिळाली नाही. गावात दुध डेअरीचा व्यवसाय सुरू केला. दुधाचा व्यवसाय चालवत असताना स्वतः च्या तीन गायी सांभाळत होता. दुधाचे दर कमी–जास्त होत असल्याने चिंतेत होता. कृषी पदविका शिक्षण घेऊन काय फायदा झाला. कुठे नोकरीची संधी उपलब्ध होत नाही. जर आरक्षण असते तर कुठंतरी संधी मिळाली असती अशा सतत आपल्या विचारात एकांतात वावरत होता. दहिफळ येथे ३ जानेवारी रोजी मराठा आरक्षणासाठी बैठक घेण्यात आली होती. आरक्षण मिळवण्यासाठी मनोज जरांगे पाटील जीवाची बाजी लावत आहेत. अखेरची लढाई सुरू आहे.




## मराठवाड्यात रेल्वे धावणार सुसाट

**नांदेड । वृत्तसंस्था**

नांदेड ते बिदर या प्रस्तावित रेल्वे मार्गासाठी राज्य सरकारने आपल्या हिश्श्याच्या ७५० कोटी रुपयांच्या प्रस्तावास मंजुरी दिली आहे. खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी यासाठी गेल्या काही दिवसांपासून पाठपुरावा केला होता. शीख समुदायाची दोन पवित्र स्थाने जोडणाऱ्या आणि नांदेड जिल्ह्यातील देगलूर, बिलोली, नायगाव या तीन तालुक्याच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वाच्या असलेल्या नांदेड–बिदर या रेल्वेमार्गाची अनेक दिवसांपासून मागणी होती. तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या कारकिर्दीत या रेल्वेमार्गाची मागणीने जोर धरला होता. या मागणीसंदर्भात त्यावेळी विचारविनिमय झाला; पण पुढे हा प्रकल्प मार्ग मागे पडला. आता केंद्र सरकारने या ब्रॉडगेज प्रकल्पाला वेग देण्याचा निर्णय घेतला आहे. या नवीन मार्गासाठी जमिनीच्या किमतीसह १५ कोटी ९८ लाख खर्च येणार असून, त्याचा ५० टक्के हिस्सा राज्य सरकारला उचलावा लागणार आहे. १५७.०५ किलोमीटर अंतर असलेल्या या प्रकल्पाची एकूण किंमत २,३५४ कोटी आहे. महाराष्ट्रातील



मार्गाची किंमत १५००.९८ कोटी असून, राज्य सरकारने ७५० कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. राज्याच्या ग्रामीण आणि अविकसित भागात रेल्वे प्रकल्पांना गती मिळावी यासाठी निवडक प्रकल्पात ४० ते ५० टक्के खर्च उचलण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारले आहे. या रेल्वे मार्गावर १८ रेल्वे स्थानके उभारण्यात येणार आहेत. बिदरचे लोकसभा सदस्य तथा मंत्री भगवंत खुबा यांनी कर्नाटक सरकारकडून त्यांच्या हिश्श्याची रक्कम देण्याची तयारी केली होती. तत्कालीन अर्थमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेसाठी निधी देण्याबाबत आश्वस्त केले होते. राज्यात आघाडी सरकार स्थापन झाल्यानंतर केंद्र सरकारच्या कोणत्याच प्रकल्पांना निधी न देण्याचा निर्णय घेतल्याने हा प्रकल्प रखडला होता; पण युती सरकारने निधी देण्याचे मान्य केले होते. खासदार प्रताप पाटील चिखलीकर व रेल्वे संघर्ष समितीने याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्याला अखेर यश मिळाले. नांदेड येथील पवित्र श्री हुजूर साहेब व बिदर येथील नानक जिरा साहेब या शीख बांधवांसाठी पवित्र असलेल्या दोन ठिकाणांना जोडणारा हा रेल्वे मार्ग असल्याने त्याला धार्मिकदृष्ट्याही महत्त्व आहे. रेल्वे मार्गासाठीच्या पाठपुराव्याला रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. काही दिवसांपूर्वी रेल्वे संघर्ष समितीच्या शिष्टमंडळासह रेल्वेमंत्र्यांची भेट घेतली होती. या रेल्वे मार्गाचे काम एक–दोन वर्षांत पूर्ण होईल.

## बेपत्ता तरुणाचा विहिरीत आढळला मृतदेह, आत्महत्या की घातपात?

**कामखेडा । वृत्तसंस्था**

रेणापूर तालुक्यातील कामखेडा येथील बेपत्ता तरुणाचा स्वतःच्या शेता शेजारील विहिरीत मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. अभय अनुरथ सूर्यवंशी ( २३ ) असे मृत तरुणाचे नाव आहे. दरम्यान, ही आत्महत्या की घातपात यावर कामखेडा गावात चर्चेला उधाण आले आहे. पोलिसांनी सांगितले, कामखेडा येथील अभय अनुरथ सुर्यवंशी (वय २३) हा रेणापूरातील शिवाजी महाविद्यालयात बी.ए. तृतीय वर्षांत शिकत असून, ३ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता मी कॉलेजला जात आहे, असे सांगून तो घरुन गेला. मात्र तो परत न आल्याने कुटूंबियांनी शोध घेतला. तसेच वडील अनुरथ सुर्यवंशी यांनी रेणापूर पोलीस ठाण्यात ४ जानेवारीला तक्रार दाखली केली. त्यानुसार पोलिस निरीक्षक अशोक अनंत्रे यांच्या मार्गदशनाखाली



अंमलदार पांचाळ तर कर्मचारी सारूळे तपास करीत होते. दरम्यान, शुक्रवारी सायंकाळी अभयचे चुलते अशोक सुर्यवंशी यांना मुलाच्या शेताशेजारी असलेल्या विहिरीत मृतदेह आढळून आला. याबाबतची माहिती रेणापूर पोलीस व बीट अंमलदार यांना दिल्यानंतर पंचनामा करुन रेणापूर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. दरम्यान, शुक्रवारी रात्री रेणापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तपास पोहे एन.आर. सारोळे करीत आहेत. अभय सुर्यवंशी हा फोनवर बोलत होता. त्यामुळे याची अधिक माहिती सायबर सेलकडून मागविण्यात आली आहे. सायबर सेल व शवविच्छेदनाचा अहवाल आल्यानंतरच घटनेचा उलगडा होणार असल्याचे पोह एन.आर. सारोळे यांनी सांगितले.

## बीडमध्ये आर्थिक गुन्हे शाखा करतेय काय?

# २६ गुन्हे, २३३ कोटींचा अपहार, तपासही झाला; पण ग्राहकांच्या हाती रुपयाही नाही

**बीड । प्रतिनिधी**

सामान्यांना जादा व्याजदराचे आमिष दाखवून मल्टिस्टेटमध्ये कोट्यवधी रुपयांच्या ठेवी ठेवून घेतल्या. नंतर याच ठेवींचा वापर इतर 'उद्योग' उभारण्यासाठी केला. नंतर हेच पैसे संबंधित ठेवीदारांना परत करता न आल्याने अध्यक्षांसह संचालक मंडळाने धूम ठोकली. सध्या बीड जिल्ह्यात अशा मल्टिस्टेटवाल्यांचे पेव फुटले आहे. मागील काही वर्षांचा आढावा घेतला असता विविध पाच मल्टिस्टेटने जवळपास २३३ कोटी रुपयांचा अपहार केला. याप्रकरणी २६ गुन्हे दाखल झाले. आर्थिक गुन्हे शाखेने तपासही पूर्ण केला; परंतु अद्यापही ठेवीदारांच्या हाती रुपयाही मिळालेला नाही. गुन्हा दाखल झाला तरी ग्राहकांना पैसे परत करण्यासह आर्थिक गुन्हे शाखा अपयशी ठरल्याचे दिसत आहे. मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात मल्टिस्टेटचे जाळे वाढत आहे. अशाच प्रकारे राज्यभरात जाळे तयार केलेल्या 'शुभकल्याण', 'परिवर्तन', 'जिजाऊ', 'मातोश्री', 'श्रीमंतयोगी' या मल्टिस्टेटने सामान्य लोकांना जादा व्याजदराचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांच्या ठेवी घेतल्या. लोकांनीही मेहनतीचे पैसे जमा करून या मल्टिस्टेटमध्ये ठेवले; परंतु या मल्टिस्टेटच्या अध्यक्ष, संचालक मंडळाने या पैशांतून स्वत:चे 'उद्योग' उभारले. त्यामुळे लोकांचे पैसे वेळेवर हे लोक परत करू शकले नाहीत. याचा बोभाटा झाल्यानंतर ठेवीदारांनी पोलिस ठाणे गाठत संबंधित मल्टिस्टेटचे अध्यक्ष, संचालक मंडळ, व्यवस्थापक आदींविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. जिल्ह्यात आतापर्यंत २६ गुन्हे दाखल झाले आहेत. या सर्वांचा तपास आर्थिक गुन्हे शाखा करीत आहे. या शाखेने गुन्ह्यांचा तपास कागदोपत्री पूर्णही केला. मालमत्ता जप्तही केल्या; परंतु त्यानंतरची सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यास गती मिळाली नाही. महसूलकडूनही या या शाखेला फारसे सहकार्य मिळाले नाही. या शाखेने अद्यापही एकाही ग्राहकाला एकही रुपया परत केलेला नाही, हे वास्तव आहे. मग ही शाखा करतेय तरी काय? असा सवाल उपस्थित होत आहे.

'ज्ञानराधा', 'साईराम' विरोधातही रोष वाढला

बीडमधील सुरेश कुटे यांची 'ज्ञानराधा' व साईनाथ परभणे यांची 'साईराम मल्टिस्टेट' ही सामान्यांचे पैसे परत करण्यात अपयशी ठरत आहे. मागील काही महिन्यांपासून या शाखा ग्राहकांना केवळ तारखेवर तारखा देत आहेत. कुटे व परभणे यांच्याकडून थेट ग्राहकांना तोंड देण्याऐवजी केवळ सोशल मीडियावर व्हिडीओ अपलोड करून शांत राहण्याचे आवाहन केले जात आहे. इकडे मात्र मेहनतीचे पैसे वेळेत आणि अडचणीच्या काळातही मिळत नसल्याने ठेवीदार संताप व्यक्त करीत आहेत.

आमच्याकडे विविध मल्टिस्टेटच्या संबंधित २६ गुन्हे दाखल आहेत. यातील जवळपास गुन्ह्यांचे दोषारोपपत्र न्यायालयात गेले आहे. मालमत्ताही जप्त केल्या; परंतु त्यानंतरची प्रक्रिया पूर्ण होण्यास अडथळे येत आहेत. आमच्याकडून पाठपुरावा सुरूच आहे. हरिभाऊ खाडे, पोलिस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, बीड

**कोणत्या मल्टिस्टेटने केला घोटाळा शुभकल्याण मल्टिस्टेट**

एकूण गुन्हे १० अपहार रक्कम – १०० कोटी
जप्तीचा प्रस्ताव – ४५ कोटी
राज्यातील ठेवीदार – १७४७ ---

परिवर्तन मल्टिस्टेट
एकूण गुन्हे ११ अपहार रक्कम – १० कोटी ८० लाख ६९ हजार २८३ तपासात निष्पन्न रक्कम – १९ कोटी ६९ लाख ९५ हजार २०१ जप्त मालमत्ता – ७ कोटी १७ लाख ५३ हजार ९५५ रुपये
ठेवीदार निष्पन्न – ८१२

जिजाऊ मल्टिस्टेट
एकूण गुन्हे ३
अपहार रक्कम – ११० कोटी
जप्त सोने – ३९ लाख रुपये
इतर मालमत्ता – ३५ कोटी

मातोश्री मल्टिस्टेट
एकूण गुन्हे १
अपहार रक्कम – २ कोटी ३८ लाख
जप्त मालमत्ता – नाही

श्रीमंतयोगी मल्टिस्टेट, गेवराई
एकूण गुन्हे १
अपहार रक्कम – २ कोटी
जप्त मालमत्ता – नाही

एकूण गुन्हे २६ एकूण अपहार रक्कम २३३ कोटी

## भाजप आमदार सुनील कांबळेंवर गुन्हा दाखल

**पुणे । वृत्तसंस्था**

ससून रुग्णालयात आयोजित कार्यक्रमात एका पोलिस कर्मचाऱ्याला कानाखाली मारल्या प्रकरणी भाजपचे आमदार सुनील कांबळे यांच्या विरुद्ध बंड गार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत घडलेल्या या घटनेचा सर्व स्तरातून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. याच कार्यक्रमात आमदार कांबळे यांनी राष्ट्रवादीच्या एका पदाधिकाऱ्याला देखील मारहाण केली होती. भाजप आमदार सुनील कांबळे यांना पोलिस कर्मचाऱ्यावर हात उचलणे चांगलेच भोवले. सुनील कांबळे यांच्याविरोधात बंड गार्डन पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात माध्यमांमध्ये आलेल्या बातम्या आणि विरोधकांकडून सुरु झालेल्या टीकेनंतर रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. ससून रुग्णालयाच्या कार्यक्रमात आमदार सुनील कांबळे यांनी पोलीस कर्मचारी शिवाजी सरक नावाच्या कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. अजित पवारांच्या उपस्थितीत त्यांच्या पक्षाचे वैद्यकीय मदत कक्षाचे महाराष्ट्र प्रमुख जितेंद्र सातव यांना भाजपचे पुणे कॅन्टोन्मेंटचे आमदार सुनील कांबळे यांनी कानशीलात लगावली. पुण्यातील ससून रुग्णालयात हा प्रकार घडला. ससून रुग्णालयात तृतीय पंथीयाच्या स्वतंत्र वॉर्डचे उद्घाटन पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले होते. मात्र या कार्यक्रमाच्या कार्यक्रम पत्रिकेत स्थानिक आमदार म्हणून आपले नाव नसल्याचे म्हणत आमदार सुनील कांबळे संतप्त झाले आणि त्यांनी सातव यांच्या कानशीलात लगावली. यानंतर सातव यांनी आपण या घटनेची माहिती अजित पवारांना देऊ अस म्हटले आहे. तर उद्घाटनाचा कार्यक्रम संपल्यानंतर मंचावरून खाली उतरताना कांबळे यांनी त्या ठिकाणी कार्यरत असलेले पोलिस कर्मचारी शिवाजी सरक यांच्या कानशिलात लगावली होती.

बीड विशेष

महाराष्ट्राचा बुलंद आवाज

| बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

दैनिक **मराठवाडा पत्र**

रविवार, दि. ७ जानेवारी २०२४ • पान 4

## महत्त्वाचे वृत्त..

### अपघातातात लाईनमन महेश गिरी ठार

केज : धारुर येथून अंबाजोगाईकडे जाताना दुचाकीचा अपघात होऊन उपचारादरम्यान लाईनमनचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि.५) सायंकाळी घडली आहे. या घटनेने धारुर व आडस येथे महावितरण कर्मचारी व नागरिकांमधून दु:ख व्यक्त केले जात आहे. महेश चंद्रकांत गिरी ( वय ३० वर्ष ) रा. बनसारोळा ( ता. केज ) हल्ली मुकाम अंबाजोगाई असे मयत लाईनमनचे नाव आहे. ते मागील काही वर्षांपासून धारुर येथे महावितरण कंपनीमध्ये लाईनमन म्हणून कार्यरत आहेत. मागे काही महिन्यांपूर्वी आडस येथे बदली झाली परंतु त्यांच्या काही शारिरीक अडचणींमुळे त्यांना धारुर येथे कर्तव्यावर ठेवण्यात आले. गिरी नियमित अंबाजोगाई ते धारुर असा दुचाकीवरून प्रवास करत असतं. शुक्रवारी ( दि. ५ ) नेहमीप्रमाणे ते दुचाकीवरून धारुर येथून अंबाजोगाईला जात होते दरम्यान ते आडस येथून ५ किमी अंतरावरील केंद्रेवाडी शिवारातील आश्रम शाळेजवळ आले असता दुचाकीवरून पडल्याने गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी मदत करत त्यांना तातडीने अंबाजोगाई येथे स्वाराती रुग्णालयात दाखल केले. येथे उपचार करुन पुढील उपचारासाठी लातूर येथे घेऊन जाताना त्यांचे निधन झाले. ही घटना समजताच धारुर,आडस येथील महावितरणवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. महेश गिरी यांची कर्तव्यदक्ष कर्मचारी अशी ओळख होती.

### व्हॉईस ऑफ मीडियाच्यावतीने दर्पण दिन साजरा

गेवराई : लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणुन पत्रकारांकडे पाहिले जाते. समाजात पत्रकारांची भूमिका महत्वाची असून समाजातील दीनदुबळ्यांना तसेच वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी दक्ष पत्रकार नेहमीच त्यांच्या मदतीला धावून जातात असे मत उपस्थित मान्यवरांनी दर्पण दिनानिमित्त बोलताना व्यक्त केले. व्हॉईस ऑफ मीडिया गेवराई तालुका व दक्ष पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार ६ जानेवारी रोजी मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृति दिनानिमित्त सामाजिक दायित्व म्हणून शहरातील कै.भगवानराव ढोबळे विद्यालयातील मुकबधीर व मतिमंद विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच खाऊचे वाटप करुन त्यांच्या सोबत दर्पण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तत्पूर्वी दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करत अभिवादन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर सहारा बालग्रामचे संचालक संतोष गर्जे, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवा नेत्या पुजा मोरे, उमापूरचे युवा सरपंच किरण आहेर, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भुतेकर, डिजीटल मिडीयाचे कार्याध्यक्ष दिनकर शिंदे, तालुकाध्यक्ष अविनाश इंगावले, उपाध्यक्ष सुभाष शिंदे, सचिव सोमनाथ मोटे, कार्याध्यक्ष जावेद शेख, डॉ.चंद्रशेखर गवळी, गणेश डिंगरे, अमोल पवार, सतिष घुमरे, अशोकराव मोरे, नामदेव माने, समाधान वाव्हळ, मुख्याध्यापक माणिकराव रणबावळे, शिवाजी ढोबळे,रवींद्र अरबाड, संदीप खाडे, प्रल्हाद बोंदरे, अंकुश लाटे, प्रशांत सरोदे, संतोष पुंड यांच्यासह मतिमंद व मुकबधीर निवासी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विविध संघटनेचे पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळीनी दर्पण दिनानिमित्त उपस्थित राहून पत्रकार बांधवांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हा उपाध्यक्ष विनोद नरसाळे, जिल्हा उपाध्यक्ष ▸▸ पान २ वर

### किराणा दुकानात दरोडा

माजलगाव : शहरातील रंगोली टी कॉर्नर ,गढी रोड येथील एका किराणा दुकानात ७ युवकांनी घुसून दुकान मालका सह त्याच्या नोकरा ला लोखंडी रॉड ने मारहाण करत दुकान मालकाच्या खिश्यातुन १०-१२हजार रु.जबरदस्तीन काढूण घेतल्याच्या फिर्यादी वरुन त्या युवकां विरोधात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माजलगाव शहरातील नवनाथ नगर भागातील रहिवासी असलेला फिर्यादी सारंग सुभाषराव सोळंके यांचे जयभवानी ट्रेडर्स नावाचे किराणा दुकान रंगोली टी कॉर्नर,गढी रोड माजलगाव येथे आहे. प्रकरणातील आरोपी नामे संकेत कासार,रा.पंचशील नगर माजलगाव व त्याच्या सोबत इतर ६ युवकांनी ४ जानेवारी रोजी च्या रात्री ७:२० च्या सुमारास त्याच्या दुकानात बेकायदेशीर पणे घुसले. नंतर त्या युवकांनी लोखंडी रॉड ने फिर्यादी व त्याच्या नोकाराला मारहाण केल्या वर फिर्यादी च्या खिश्यातील अंदाजे १०-१२ रु.जबरदस्तीनं काढूण घेत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. अशी फिर्याद सारंग सोळंके यांनी ५ जानेवारी रोजीच्या मध्यरात्री नंतर च्या ००.२५ वा.दिल्याने नमुद आरोपीं विरोधात भादंवी.कलम ३९५,५०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाले आहेत तर त्याचा तपास पोउपनि.सोनटक्के करीत आहेत.

### विमल अमरापूरकर यांचे दु:खद निधन

बीड : श्री सुहास सखाराम पंत अमरापूरकर यांच्या मातोश्री श्रीमती विमल सखाराम पंत अमरापूरकर यांचे शनिवार दिनांक ६ जानेवारी रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी अल्प आजाराने दुख:द निधन झाले आहे.त्यांच्या पचात मुले मुली व मोठा नातेवाईक परीवार आहे.अंत्यविधी भगवानबाबा प्रतिष्ठान शेजारील अमरधाम येथे करण्यात आला.

# मराठा आरक्षण, शिवस्मारकाच्या स्वप्नपूर्तीसाठी लढा देणार -शिवसंग्राम



**बीड । प्रतिनिधी**

शिवसंग्राम सामाजिक संघटनेचा बावीसावा वर्धापन दिन जिल्ह्यात गावोगावी मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम लोकनेते मेटे साहेब यांच्या समाधीस्थळी अभिवादन करून शिवसंग्राम भवन, बीड येथे लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब व महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.शिवसंग्राम संघटनेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत साहेबांची सामाजिक व राजकीय भूमिका ज्यांनी जवळून पाहिली असे साहेबांचे सहकारी व शिवसंग्रामचे शिलेदारांना सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी शिवसंग्रामचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते . शिवसंग्राम या सामाजिक संघटनेची स्थापना ६ जानेवारी २००२ रोजी रायगडावर लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब व त्यांच्या सवंगड्याने केली . या घटनेला आज २२ वर्षे पूर्ण झाले म्हणून शिवसंग्रामचा बावीसावा वर्धापन दिन साजरा करण्यात आला . शिवसंग्राम संघटनेच्या स्थापनेमधील त्यांचे जुने सहकारी योगेश शेळके, बळीभाऊ थापडे, कैलास शेजाळ , अखिल भाई , दशरथ भोसले, कैलास माने , सुहास पाटील, कुतुबभाई, ज्ञानेश दादा पानसंबळ, बंडू बापू शहाणे , बंडू शिंदे यांचा यथोचित स्वागत सत्कार करण्यात आले . या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना त्यांनी आज शिवसंग्रामचा महाराष्ट्राच्या राजकारणातील घटक पक्ष म्हणून समावेश आहे व शिवसंग्रामचे विधानसभेमध्ये तीन व विधान परिषद मध्ये एक अशी एकूण चार आमदार होते . हा राजकीय प्रवास वाटतो तेवढा सोपा नव्हता . तसेच स्वकर्तृत्वाने व स्वकष्टाने गोरगरीब वंचित उपेक्षित सर्व धर्मातील सवंगडी मावळ्यांना सोबत घेऊन साहेबांनी आपली सामाजिक व राजकीय वाटचाल सुरू ठेवली . वंचित उपेक्षितांना न्याय मिळावा - हक्क मिळावा . त्यांच्या अधिकार त्यांना मिळावे म्हणून या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून आवाज उठवला हे करत असताना अनेक अडचणींचा सामना ही त्यांना करावा लागला परंतु कधीही डगमगले नाहीत . त्यांनी नेटाने काम करत स्वाभिमान आणि संघर्ष आपल्या मावळ्यांना शिकवला . आज त्याच्याच बळावर ही शिवसंग्राम संघटना छोट्याशा रोपट्याचं वटवृक्षात रूपांतर झाले आहे . लोकनेते स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांची अनेक स्वप्न होती त्यापैकी एक मागील निवडणुकांमध्ये बीड विधानसभा मतदारसंघातून लोकनेते मेटे साहेबांचा अगदी निसटता पराभव झाला व ही सल ▸▸ पान २ वर

## शाळा पाहणी दरम्यान सहशिक्षिका निलंबित

**बीड । प्रतिनिधी**

शाळेस भेट देण्यासाठी जिल्हा न्यायाधीश आले असता, एक सहशिक्षिका मोबाइलवर बोलत असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी बीड शहरातील गांधीनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सहशिक्षिका एस. आर. आंधळकर यांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी शुक्रवारी निलंबित केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशावरून शाळांना भेटी देणे सुरू होते. दरम्यान, ११ सप्टेंबर रोजी जिल्हा न्यायाधीश -१ एस. आर. पाटील यांनी बीड शहरातील गांधीनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस भेट दिली. या भेटीदरम्यान सहशिक्षिका एस. आर. आंधळकर या मोबाइलवर संभाषण करीत असल्याचे निदर्शनास आले. सदरील प्रकारावरून आपणास निलंबित करून विभागीय चौकशी का करण्यात येऊ नये? अशी कारणे दाखवा नोटीस सहशिक्षिका आंधळकर यांना जि. प. शिक्षण विभागाने बजावली होती. नोटीस खुलाशामध्ये मोबाइलवर संभाषण करीत असल्याचे सहशिक्षिका आंधळकर यांनी मान्य केले. जि. प. सेवा शिस्त व अपील नियमामधील तरतुदीनुसार सहशिक्षिका एस. आर. आंधळकर यांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी शुक्रवारी निलंबित केले.

## बीड ग्रामीणच्या हद्दीत अवैध धंदे जोमात;पोलीस यंत्रणा कोमात!

**बीड । प्रतिनिधी**

बीड ग्रामीण पोलिसांची एका हत्तेखोर पोलिसांनी तीनशे रुपये इज्जत घालवली होती. या प्रकरणात वरिष्ठांनी कारवाई करत संबंधित पोलीस ठाणे च्या प्रमुखांना थेट कंट्रोलचा रस्ता दाखवला. या प्रकरणाचा बीड ग्रामीण पोलिसांनी कसलाही बोध घेतला नसल्याचे दिसून येत आहे. बीड ग्रामीण पोलिसांच्या हद्दीत अनेक भागात मटक्याचा जोर वाढला आहे. सर्वच धाब्यावर दारू पिण्याचे लायसन्स देण्यात आले आहेत का? पत्त्याचे क्लब, गुटक्याची तस्करी, यासह गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांनी डोके वर काढले आहे. बीड ग्रामीण हद्दीत काम करणाऱ्या बीट अंमलदारांची तात्काळ चौकशी झाल्यास हप्ते खोरीचा रेकॉर्ड बाहेर येईल. नूतन ठाणे प्रमुख रणखांब साहेब बीड ग्रामीण पोलिसांचा गुन्हेगारावरचा वचक संपला आहे का? असा प्रश्न सर्वसामान्य जनता विचारत असून बीड ग्रामीण पोलिसांच्या हद्दीत कोणताही अवैध धंदे करा व हप्ते साहेबांना पोहोचवा असा संदेश तर दिला जात नाही ना. खाकी वर सर्वसामान्यांचा विश्वास आहे. मात्र बीड ग्रामीण पोलिसांच्या हद्दीतील धंदे पाहून तो विश्वास डळमळीत झाला असल्याची दिसून येत आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी आपल्या कर्तव्य निष्ठेने पोलीस विभागाची मान नेहमीच उंचावली आहे. गुन्हेगारांना वचक निर्माण करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर अहोरात्र झटत आहेत. मात्र त्यांच्या पाठीमागे ठाणे प्रमुख काय दिवे लावत आहेत. एका गरीब रिक्षावाल्याकडून तीनशे रुपये हप्ता घेताना लाच लुचपत विभागाने एका पोलीस शिपायाला अटक केली होती याचे गंभीर पडसाद पोलीस विभागावर पडले. जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी तात्काळ कारवाई करत त्या शिपायला निलंबित तर ठाणे प्रमुखांना कंट्रोलचा रस्ता दाखवला. एस पी साहेबांच्या कठोर भूमिके पुढेही ग्रामीण पोलीस नतमस्तक होताना दिसत नाहीत. थोडासा कालावधी लोटताच ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे जोमात सुरू झाले आहेत. पान टपऱ्या, छोटे हॉटेल्स या ठिकाणी मटक्यांच्या एजंट यांनी आपले पंटर तयार केले आहेत. तर बीड ग्रामीण पोलिसांच्या हद्दीतील प्रत्येक धाब्यावर खुलेआमपणे दारू पिण्याचे प्रमाण वाढले आहे.

बीड ग्रामीण पोलिसांच्या नजरेसमोर हा सर्व प्रकार सुरू आहे. प्रत्येक भागात बीट अंमलदारांची नियुक्ती अवैध धंदे रोखण्यासाठी करण्यात आलेली आहे . मात्र याचा गैरफायदा घेतला जात आहे का? रणखांब साहेब हलकट लोकांमुळे बीड ग्रामीण पोलीस बदनाम होत आहे का? बीड ग्रामीण पोलिसांची नाचक्की करणाऱ्या व अवैध धंद्यांना बळकटी देणाऱ्या पोलिसांना घरचा रस्ता दाखवा. ग्रामीण पोलिसांचा गुन्हेगारावरचा वाचक संपला असल्याचे दिसून येत आहे. ठाणे प्रमुख म्हणून आपली जबाबदारी ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्था ठेवण्याची आहे. याकडे जरा गांभीर्याने पहा. बीड ग्रामीण पोलीस च्या हद्दीत असलेल्या धंद्यांना कायम बंद करण्यासाठी मोहीम काढा. जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या बीड गुन्हेगारी मुक्त अभियानाला साथ द्या नसता पुन्हा तीनशे रुपयांचे प्रकरण एखाद्या पोलिसाच्या व अधिकाराच्या अंगलट येऊ शकते.

## विकास कामांसाठी १५३ कोटींचा निधी -मुंडे

**परळी । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील विद्युत वितरणास बळकटी देण्यासाठी केज, माजलगाव व परळी उपविभागतील ६० उपकेंद्रांच्या अंतर्गत १५२ फिडरच्या कामांना आरडीएसएस योजनेतून तब्बल १५३ कोटी ७१ लाख रुपये इतका निधी मंजूर करून उपलब्ध करून दिला आहे. परळी मतदारसंघात यांतर्गत परळी व अंबाजोगाई उपविभागासाठी सुमारे ४० कोटी रुपये इतका निधी मंजूर करून देण्यात आला असून, यांतर्गत ११ केव्ही क्षमतेचे फिडर बसवण्यात येणार आहेत. यामुळे विद्युत पुरवठा सुरळीत होण्यास मोठ्या प्रमाणात मदत होणार आहे. परळी मतदारसंघातल्या अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर, पूस, हतोला, गिरवली, बाभळगाव, सायगाव, मुर्ती, पोखरी, जवळगाव, मोरेवाडी, भारज, राडी, अकोला, देवळा तसेच परळी तालुक्यातील हाळम, लाडझरी, सोमेश्वर नगर, रतनेश्वर नगर, कपिलेश्वर, इंजेगाव, बेलेश्वर, धामुनी, जयगाव, जीवनापूर, गोवर्धन, आचार्य टाकळी, कानडी, पिंप्री, हिवरा, बोरखेड, तेलसमुख, सिरसाळा, रेवली, वाका, खामगाव, साळेगाव, कांनापुर, कन्हेरवाडी या फिडरच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय केज उपविभागत २१ सबस्टेशन अंतर्गत ५१ फिडर साठी ५२ कोटी तसेच माजलगाव उपविभागतील २१ सबस्टेशन अंतर्गत सर्वाधिक ५९ फिडरसाठी ६० कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

## दर्पण दिनानिमित्त पत्रकार संघाच्या पुरस्कारांचे वितरण

**बीड । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुका आदर्श पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिनानिमित्त आदर्श पुरस्कार वितरण सोहळा शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकात पार पडला.या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर यांची तर प्रमुख अतिथी म्हणून सिद्धेश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री, कालिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे, आय.बी.एन.लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी सुरेश जाधव माजी सैनिक अशोक गिरी,व्यापारी संघटनेचे अध्यक्ष बबनराव ढाकणे यांची उपस्थिती होती.आद्यपत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात झाली.त्यानंतर आदर्श युवा उद्योजक म्हणून शंकर तांबे,आदर्श समाजसेवक जयेश कासट,आदर्श प्रशासकीय अधिकारी यांना सन्मानचिन्ह,शाल आणि पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.या वेळी कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष प्रकाश देसारडा,जि.प.सदस्य शिवाजी पवार,रामदास बडे,माजी उपनगराध्यक्ष बाबुराव झिरपे, माजी सभापती निवृती बेदरे, नगरसेवक डॉ.भगवान सानप,वसंत काटे, पोलीस उप निरीक्षक औदुंबर मस्के,माजी नगराध्यक्ष दत्ता पाटील गाडेकर,अक्षय रणखांब,अरुण भालेराव,गणेश तळेकर,भिमराव गायकवाड,दहिवंडी सेवा सहकारी सोसायटीचे चेरमन कचरू आघाव चेरमन संतोष सवासे, कल्याण तांबे,ॲड. संतोष ढाकणे, प्रदीप निंबाळकर, कालिकादेवी विद्यालयाचे ▸▸ पान २ वर

## पत्रकारांचा सन्मान सोहळा संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

आज मराठी पत्रकार दिन आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८८२ मध्ये 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले होते. त्यामुळे, आजचा दिवस महाराष्ट्रात 'मराठी पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो.जांभेकर यांनी दर्पण या मराठी वृत्तपत्राद्वारे देशात मराठी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवली होती. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म ६ जानेवारी १८१२ मध्ये कोकणातील पोंभुर्ले या गावात एका सामान्य कुटुंबात झाला होता.जांभेकर यांचे जीवनमान अवघ्या ३४ वर्षांचे होते. मात्र, जांभेकर यांच्या कामाची पद्धत, त्यांच्या विचारांचा ठेवा आणि समाजात प्रबोधन घडवून आणण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता.बाळशास्त्री जांभेकर यांचे प्राथमिक शिक्षण पोंभुर्ले या गावी झाले. त्यानंतर, ते मुंबईत आले.मुंबईत आल्यावर जांभेकरांनी बापू छत्रे यांच्या निवासस्थानी राहून अध्ययन सुरू केले. बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयात अभ्यास करून त्यांनी विशीच्या आत प्राध्यापक म्हणून नियुक्ती मिळवण्याइतपत ज्ञान मिळवले.१८३४ मध्ये मुंबईतल्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये पहिले एतद्देशीय व्याख्याते म्हणून जांभेकरांची नियुक्ती झाली.६ जानेवारी १८३२ मध्ये दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्राची सुरूवात जांभेकरांनी केली आणि या वृत्तपत्राच्या संपादकपदाची धुरा त्यांनी सांभाळली.अवघ्या २० व्या वर्षी त्यांनी दर्पणच्या संपादकपदाची मोठी जबाबदारी पेलली.बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या मराठी वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन केले.जांभेकरांनी समाजातील वर्णव्यवस्था, स्त्री दास्य, अस्पृश्यता, बालविवाह, जातीभेद इत्यादी गोष्टींवर त्यांनी आवाज उठवला, वृत्तपत्रांतून लिखाण केले. त्यामुळे, त्यांना आद्य समाजसुधारक ही म्हटले जाऊ लागले.

## धारूर महाविद्यालयामध्ये पत्रकारांचा सत्कार

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये दिनांक ६ जानेवारी रोजी दर्पण दिनानिमित्ताने महाविद्यालयामध्ये धारूर शहर व परिसरातील पत्रकार बंधूंचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. या समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते पत्रकारांस पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्यांनी विचार व्यक्त करताना सांगितले की, वर्तमानपत्रे ही लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ मानला जातो. पत्रकार हा दैनंदिन समाज जीवनात घडणाऱ्या विविध घटना सबंधीच्या बातम्या वर्तमानपत्रांतून सामान्य जनतेपर्यंत पोहोचवितात. त्यामुळे सहाजिकच वर्तमानपत्र ही जनतेला विविध विषयांची माहिती देणारी साधने ठरतात. दर्पण दिनाच्या माध्यमातून समाज भान जागविणाऱ्या व्यक्तीत्वांचा सत्कार यानिमित्ताने महाविद्यालयात होत आहे याचा अभिमान वाटतो असे सांगितले. सत्कार समारंभ प्रसंगी पत्रकार श्री. प्रकाश काळे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, दर्पण दिन अर्थात पत्रकार दिन आज सर्वत्र साजरा होत आहे. मराठी भाषेतील पहिले वर्तमानपत्र या दिवशी सुरू झाले. त्यामुळे मराठी पत्रकार सृष्टीचे मुहूर्तमेढ रोवणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे स्मरण यानिमित्ताने होते. आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे बहुभाषक होते त्यामुळे या महाविद्यालयात इतरही भाषा विद्यार्थ्यांना शिकण्याची सोय उपलब्ध व्हावी. महाविद्यालयातून ज्ञानदानाचे पवित्र कार्य होते. या महाविद्यालयाला राजमाता जिजाऊ असे नाव मिळावे अशी भावना याप्रसंगी व्यक्त केली. या सत्कार समारंभाच्या निमित्ताने श्री. सूर्यकांत जगताप यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना या महाविद्यालयाने विविध क्रीडा प्रकारातील अनेक खेळाडूंना घडविण्याचे कार्य केले आहे. या पत्रकार दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाला राजमाता जिजाऊ हे नामकरण, क्रीडा शिक्षक व स्वतंत्र पोलीस चौकी असणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. तसेच पत्रकार दिनाच्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा दिल्या. दर्पण दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये पत्रकार श्री. प्रकाश काळे, श्री. सय्यद शाकेर, श्री. धनंजय कुलकर्णी, श्री. महादेव देशमुख, श्री. दिनेश कापसे, श्री. परमेश्वर राऊत, श्री. संदिपान तोंडे, श्री. सूर्यकांत जगताप, श्री. अविनाश जगताप, श्री. सतीश पोतदार, श्री. अतिक मोमीन, श्री. साखरे सुभाष, श्री. रवि गायसमुद्रे, श्री. विठ्ठल वाघमोडे या धारूर शहर व परिसरातील पत्रकार बंधूंची सत्कार समारंभाला उपस्थिती होती. यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, ▸▸ पान २ वर

## बीडच्या आदित्य शिक्षण संस्थेचा रायगड विद्यापीठात नावलौकिक

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांनी आतापर्यंत विविध क्षेत्रात आपले आणि संस्थेचे नाव मोठे केले आहे. शैक्षणिक क्षेत्राबरोबर क्रीडा क्षेत्रातही आदित्य शिक्षण संस्थेने मोठी झेप घेतली आहे. नुकत्याच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोनेरे, रायगड येथे पार पडलेल्या अविष्कार स्पर्धेत आदित्य शिक्षण संस्थेतील फार्मसीच्या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावत ही स्पर्धा जिंकली. यामुळे बीड जिल्ह्याचे नाव रायगडच्या विद्यापीठात अभिमानाने घेतलं गेलं. शहरातील आदित्य फार्मसी महाविद्यालयाचा एम. फार्मसी. प्रथम वर्षातील विद्यार्थी सौरभ धूत याने अविष्कार स्पर्धेमध्ये ह्युम्युनिटी लैंग्वेज, अँड फाईन आर्ट यामधून विभागीय स्पर्धेत प्रथम आला होता आता. त्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोनेरे, रायगड येथील फायनल विद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. त्या स्पर्धेतही सौरभ ने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम पारितोषिक जिंकले. या यशाबद्दल सौरभचे आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्य तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ.आदिती सारडा मॅडम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हिंगणे लहू, प्रा. लतीफ बागवान, शिंदे रूपाली, खाडे प्रतीक्षा, माने मॅडम, स्वामी मॅडम, काठोळे सर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. सौरभ धुतला या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे अविष्कारचे डॉ. संजय खोब्रागडे सर, डॉ वरखेडे सर, तेजस सर, अनिकेत सर, बटोवले सर यांचे मार्गदर्शन मिळाले.